http://www.sgbauonline.com/



# B.A. Part-I (Semester-I) Examination
## (Optional Subjects)
## RASHTRASANT TUKDOJI THOUGHT

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 80

सूचना :— (1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य.
(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
(3) प्रश्न क्र. 5 मधील सर्व बहुपर्यायी प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

1. राष्ट्रसंत तुकडोजींच्या जीवन कार्यातून आपणास कोणता जीवनमार्ग मिळतो ? 16

किंवा

'आरती मंडळ' स्थापनेमागील राष्ट्रसंतांची भूमिका स्पष्ट करून या संघटनेचे कार्य स्पष्ट करा. 16

2. स्वातंत्र्यपूर्व काळात विदर्भामध्ये सज्जनांच्या संघटनेची उभारणी राष्ट्रसंत तुकडोजींनी कशी केली ? 16

किंवा

बेचाळीसच्या क्रांतियुद्धात राष्ट्रसंतांची भूमिका ही युद्धप्रसंगी जरूर ती सर्व क्रांतिसूत्रे हलवून प्रत्यक्ष विजयाचे श्रेय तरुणाईला देणाऱ्या संघटन — कुशल सेनापतीची होती' स्पष्ट करा. 16

3. थोडक्यात उत्तरे द्या :
(1) राष्ट्रसंत तुकडोजींनी रामटेकच्या जंगलात तप: साधना केली.-स्पष्ट करा. 4
(2) राष्ट्रसंत तुकडोजींचा ताडोबा — रामदिघी जंगलातील संचार स्पष्ट करा. 4
(3) राष्ट्रसंत तुकडोजींनी अस्पृश्यता उच्चाटन कशा प्रकारे केले ? 4
(4) राष्ट्रसंत तुकडोजींनी सर्व धर्म समभाव स्थापित करण्यासाठी राबविलेले उपक्रम स्पष्ट करा. 4

किंवा

(1) राष्ट्रसंत तुकडोजींचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक कार्य सांगा. 4
(2) राष्ट्रसंत तुकडोजींची कुंभमेळ्यातील साधुसंतांच्यामन:शुद्धी संदर्भातील भूमिका स्पष्ट करा. 4
(3) आदिवासी-शेतकरी-शेतमजुरांत राष्ट्रसंत तुकडोजींनी जागृती कशी निर्माण केली ? 4
(4) राष्ट्रसंत तुकडोजींनी हिंदू-मुस्लिम ऐक साधण्यासाठी अमरावतीमध्ये कोणता उपक्रम राबविला ? 4

4. थोडक्यात उत्तरे द्या :
(1) मानव संसाधन व राष्ट्रीय साधन-संपत्ति. 4
(2) राष्ट्रसंत तुकडोजीचे व्यावसायिक शिक्षणासंदर्भातील विचार स्पष्ट करा. 4
(3) चातुर्मास्य व अन्य शिबिरांमधून सैनिकी शिक्षण देण्यामागची राष्ट्रसंत तुकडोजींची भूमिका स्पष्ट करा. 4
(4) राष्ट्रसंत तुकडोजींचे कौटुंबिक पातळीवरील जीवनमूल्य संवर्धनाबाबतीतील विचार स्पष्ट करा. 4

किंवा

(1) राष्ट्रसंत तुकडोजींचे महिला संगठनाविषयीचे मत स्पष्ट करा व उन्नतीभुवन ही कल्पना समजावून द्या. 4
(2) सावित्रीबाई फुलेंचे स्त्री-मुक्ति विषयक कार्य स्पष्ट करा. 4
(3) राष्ट्रसंत तुकडोजींचे महिला क्रिडा व व्यायाम विषयक कार्य सांगा. 4
(4) ताराबाई शिंदेचे स्त्री मुक्ति संदर्भातील विचार सांगा 4

5. योग्य पर्याय निवडा :
(1) तैसाची आला .............. सण । हाहि आहे महत्वपूर्ण ।
यात ठेवावे बैलांचे प्रदर्शन । शेती सामाना सहित ।। 2
(नागपंचमी/होळी/पोळा)

(2) प्रत्येक माणूस सुधारण्याची कार्यशाळा म्हणजे ........ होय. 2
(पूजाअर्चा/सामुदायिक प्रार्थना/किर्तन)



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(3) एकाच दिवशी वेगवेगळ्या हजार गावांमध्ये ............ ग्रंथाचे प्रकाशन झाले 2

(भगवद्‌गीता/ज्ञानेश्वरी/ग्रामगीता)

(4) गावाचे जे पवित्र सेवक । तेचि ग्रामांचे होती ............ ।
ज्या गावी ऐसे सावध पाईक । तेथे विघ्न न शके ।। 2

(पालक/साधक/सैनिक)

(5) मंदिरी बैसोनि नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे ।
दुःखितासि प्रेमे पाणी पाजावे । हे श्रेष्ठ ............ ।। 2

(ब्रह्मज्ञानाहून/तीर्थस्थानाहून/वैकुण्ठ प्राप्तीहून)

(6) राष्ट्रसंतांनी देवभक्तांना ............ बनविले 2

(मूर्तिभक्त/प्रेमभक्त/देशभक्त)

(7) 'कशाला काशी जातो रे बाबा' हे भजन कुणाचे ? 2

(राष्ट्रसंत तुकडोजी महाराज/संत तुकाराम/संत एकनाथ)

(8) कच्चा माल मातीच्या भावे । पक्का होता चौपटीने घ्यावे ;
मग ............ कैसे सुखी व्हावे । पिकवोनीहि ते उपाशी ।। 2

(संतजन/ग्रामजन/विश्वजन)



http://www.sgbauonline.com/